**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करते की,**

माझे नाव – वेदिका राजेंद्र ताम्हणकर , वय – १७ वर्षे,

व्यवसाय – शिक्षण

रा. – रहाटेश्वर, गढीताम्हाणे

**<u>शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे प्र.सहा.सरकारी अभियोक्ता श्री.ए.ए. गुमास्ते यांचे मार्फत.</u>**

०१. माझ्या कुटुंबात मी, माझे आईवडील व माझ्या दोन बहिणी असे राहतो. दि.२६/०२/२०२२ रोजी सकाळी ८.३० वा. आम्ही सर्व घरात होतो. मी झोपलेले होते. त्यावेळी आनंद ताम्हणकर हे आमच्या घराबाहेर आले व आम्हाला शिवीगाळ करु लागले व बाहेर ये तुला दाखवतो असे ते म्हणत होते. त्यानंतर आनंद यांचा भाऊ अरुण ताम्हणकर तेथे आला. त्यांनी लाकडी दांडयाने आमच्या दरवाजावर आपटले. आमचा दरवाजा थोडासा उघडा होता. माझ्या आईने त्यांना काय करता असे विचारले असता आनंद ताम्हणकर याने आईच्या दोन्ही हातावर लाकडाने मारले. तेव्हा माझे वडील बाहेर आले. आनंद ताम्हणकर याने माझ्या वडिलांना हाताने खेचत बाहेर आणले. आई परत विचारायला गेली असता त्याने आईला देखील घराबाहेर खेचत आणून पाडले. आनंद व अरुण दोघेही वडिलांना मारत होते. त्यानंतर पाठीमागून काशिनाथ ताम्हणकर व सरिता ताम्हणकर आले. काशिनाथ, सरिता व आनंद ताम्हणकर तिघेही काठीने माझ्या वडिलांना मारत होते. त्यानंतर माझी आजी घराबाहेर आली. तिला सरिता ताम्हणकर हिने केस ओढले व हाताने मारले. मी सोडवायला गेले असता सरिता व अरुण यांनी मला ढकलले. माझ्या वडिलांच्या उजव्या हाताला मार लागला होता, रक्त येत होते व डाव्या हाताचे बोट सुजले होते. आईचा हात सुजला होता. आरोपी शिवीगाळ व मारहाण करुन निघून गेले. त्यानंतर आई व वडिलांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार केली.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. के.के.मराठे यांचे मार्फत.</u>**

०२. मी सध्या कॉमर्स शिकत आहे. मी हुशार व प्रामाणिक विदयार्थी आहे. माझ्या जबाबात मी पोलिसांना दि.२६/०२/२०२२ रोजी सकाळी ८.३० वा. च्या दरम्यान मी, माझे आईवडील व बहीणी खोली समोर मोकळया जागेत उभे होतो असे सांगितले नव्हते. आता मला माझ्या टिपणातील

**अधोरेखित भाग अ** वाचून दाखवला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. पोलिसांनी असे का लिहीले आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. मी सोडवायला गेले असता सरिता व अरुण यांनी मला ढकलले असे मी माझ्या जबाबात पोलिसांना सांगितले होते. हा मजकूर माझ्या तपास टिपणात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.हे चारही आरोपी मला एकाच वेळी येताना दिसले असे काही घडले नव्हते. चारही आरोपी जागेवर आल्यावर त्यांनी दांडे घेतले होते असे माझे म्हणणे आहे . मी पोलिसांना माझ्या जबाबात आरोपी हातात दांडे घेऊन येताना दिसले असे सांगितले होते. हे खरे की, दांडे आरोपींकडे कसे आले हे मला सांगता येणार नाही. हे खरे की, घटनेमधील दांडयाची संख्या व न्यायालयात असलेल्या दांडयाची संख्या यामध्ये फरक आहे. हे खरे की, मी , माझे आईवडील व आजी यांचा जबाब पोलिसांनी एकाचवेळी घेतला. पोलिसांनी घरी येऊन जबाब घेतला होता. पोलिसांनी माझा जबाब हाती लिहून घेतला की कसा घेतला हे मला आठवत नाही. पोलिसांनी संगणकावर माझा जबाब घेतला व मला दाखवून त्याची खातरजमा करुन घेतली असे काही घडले नाही. हे खरे की, त्या दिवशी सकाळी गोठयाचे कुंपण पाडले हे त्या तक्रारीचे मुख्य कारण होते. हे खरे नाही की, आरोपी गोठयाचे कुंपण सारखे पाडतात त्यामुळे त्यांना कधीतरी धडा शिकवूया या उद्देशाने माझ्या आईवडिलांनी तक्रार केली होती.

०३. ज्या दिवशी तक्रार केली त्या दिवशी पोलीस घरी आले होते. पोलिसांनी घटनेतील दांडे आईवडिलांकडे मागितले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. पोलिसांनी त्याच दिवशी दांडे आमच्या घरातून घेतले किंवा कसे ते मला आठवत नाही. दिनांक २६ रोजी मी दिवसभर घरात होते. हे खरे नाही की, गायत्री कुडाळकर व सचिन ताम्हणकर यांची देखील तपासटिपणे पोलिसांनी त्या दिवशी घेतली होती. हे खरे की, साक्षीदार व पंच कोण घ्यायचे ही सर्व चर्चा पोलिसांनी आमच्या घरात बसून माझ्या आईवडिलांशी केली. हे खरे की, माझ्या वडिलांनी बाळकृष्ण ताम्हणकर व इमरान साटविलकर यांना साक्षीदार म्हणून या केस मध्ये याल का असे आधी विचारले होते. हे खरे की, त्यांनी तयारी दर्शविल्यानंतर त्यांची नावे साक्षीदार म्हणून घ्या असे वडिलांनी सांगितले. हे खरे नाही की, माझ्या वडिलांनी त्यांना तुम्ही काळजी करु नका येण्या जाण्याचा खर्च देऊ असे सांगितले. हे खरे नही की, सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे.

०४. हे खरे नाही की, माझ्या आईने त्यांना काय करता असे विचारले असता आनंद ताम्हणकर याने आईच्या दोन्ही हातावर लाकडाने मारले, तेव्हा माझे वडील बाहेर आले, आनंद ताम्हणकर याने माझ्या वडिलांना हाताने खेचत बाहेर आणले, आई परत विचारायला गेली असता त्याने आईला देखील घराबाहेर खेचत आणून पाडले, आनंद व अरुण दोघेही वडिलांना मारत होते,

पाठीमागून काशिनाथ ताम्हणकर व सरिता ताम्हणकर आले, काशिनाथ, सरिता व आनंद ताम्हणकर तिघेही काठीने माझ्या  वडिलांना मारत होते, त्यानंतर माझी आजी घराबाहेर आली, तिला सरिता ताम्हणकर हिने केस ओढले व हाताने मारले, मी सोडवायला गेले असता सरिता व अरुण यांनी मला ढकलले, माझ्या वडिलांच्या उजव्या हाताला मार लागला होता, रक्त येत होते व डाव्या हाताचे बोट सुजले होते, आईचा हात सुजला होता, हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–
(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि. ०७/११/२०२४